Literacy for a Billion

Movie: Paulwaat
Year: 2011

Song: Ek Aabhaal Nave
Lyricist:

चल उचल पाऊल
रान उजळलं सारं
नव्या जोमानं फिरलं
नव्या पहाटचं वारं
येस गाठाया निघाली
सुर्व्या देवाची पालखी
शीळ घालत चाललं
चार दिशांचं भोईर
आता आभाळ हवे
एक आभाळ नवे
आता आभाळ हवे
एक आभाळ नवे
स्वप्न डोळ्यात मावेना
थिटे अंगण भावेना
स्वप्न डोळ्यात मावेना
थिटे अंगण भावेना
वेध लागले दिशांचे
पंख काबूत राहीना
आता स्वतःचे स्वतःचे

एक आभाळ हवे
मन मागते मनाला
एक आभाळ हवे
हो आता आभाळ हवे
एक आभाळ नवे
हां...
मन माझे मन माझे
मन माझे मन माझे
सैरभैर सैरभैर
भरारी विना
नको नको झाल्या जुन्या
पाऊलखुणा
दूरवर माझी नवी
चाहूल वाजे
स्वतःस भेटाया मन
आतूर माझे
मन माझे मन माझे
आता आभाळ हवे
एक आभाळ नवे

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*